Book Code : EDU 403
Course Code : EDU403



अभ्यासक्रम आणि भाषा

EDU 403

अधिष्ठान अभ्यासक्रम

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

Sprmolde (2)

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

EDU 403

अभ्यासक्रम आणि भाषा

अभ्यासक्रम आणि भाषा

लेखक : डॉ. कविता साळुंके, डॉ. भूषण कर्डिले, डॉ. एस. के. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. उबाळे, डॉ. दत्तात्रेय तापकीर, प्रा. विजयकुमार पाईकराव, श्रीम.ज्योती लष्करी, डॉ. पी. बी. दराडे, डॉ. एस. बी. वाळके, श्री. सचिन पोरे

घटक १ :	शालेय विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी	०१
घटक २ :	वर्गातील भाषिक अभिव्यक्तीचे स्वरूप	३५
घटक ३ :	माहितीचे अवांतर वाचन व लेखन	६८

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्र. संचालक : डॉ. कविता साळुंके

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद सदस्य

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. आर. बी. मानेकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय
अकोल

डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य विजय जवळेकर
अध्यापक महाविद्यालय
मुंबई

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
अध्यापक महाविद्यालय
नाशिक

प्राचार्य उर्मिला धूत
शासकीय अध्यापक महाविद्यालय
परभणी

डॉ. सुरेश पाटील
प्र. संचालक, मूल्यमापन विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. डी. डी. पवार
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. जयदीप निकम
प्र. संचालक, आरोग्य विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्री. एस. व्ही. चौधरी
माजी संचालक, इग्नो
दिल्ली

प्रा. माधव पळशीकर
सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

तज्ज्ञ सल्लागार समिती

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, नाशिक

माजी प्राचार्य डॉ. शांताराम बुटे
अकोला

डॉ. नीलिमा सप्रे
सेवानिवृत्त प्राध्यापक, कोल्हापूर

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
नाशिक

डॉ. चित्रा सोहनी
सेवानिवृत्त प्राध्यापक, पुणे

प्राचार्य वनिता काळे
अकोला

डॉ. के. एम. भांडारकर
नागपूर

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे
बीड

प्राचार्य डॉ. पी. आर. गायकवाड
औरंगाबाद

प्राचार्य डॉ. मीना कुटे
मुंबई

प्राचार्य डॉ. गजानन गुल्हाणे
शिक्षणशास्त्र विभाग, अमरावती

प्राचार्य डॉ. ह. ना. जगताप
सोलापूर

डॉ. संजीव सोनवणे
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, पुणे

डॉ. सुरेश पाटील
संचालक, मूल्यमापन विभाग, नाशिक

डॉ. वैजयंता पाटील
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, नांदेड

प्राचार्य डॉ. सुनीता मगरे
मुंबई

प्राचार्य डॉ. ए. आर. राणे
जळगाव

प्राचार्य डॉ. रेखा टोपकर
सांगली

डॉ. पद्मिनी एम.
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, कोल्हापूर

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

पाठ्यक्रम विकसन समिती

डॉ. कविता साळुंके
नाशिक

प्राचार्य निर्मला तापकीर
पुणे

डॉ. लता मोरे
नवापूर

डॉ. रमा भोसले
धुळे

डॉ. संध्या सामुद्रे
पनवेल

प्रा. विजयकुमार पाईकराव
नाशिक

डॉ. पद्मिनी एम.
कोल्हापूर

डॉ. दत्तात्रेय तापकीर
पुणे

डॉ. संचीवनी महाले
नाशिक

डॉ. पी. बी. दराडे
सोलापूर

डॉ. डी. डी. पवार
नाशिक

श्री. सचिन अशोक पोरे
नाशिक

डॉ. विजया पाटील
नाशिक

डॉ. सुचेता संकपाळ
नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
नाशिक

श्रीमती ज्योती आर. लष्करी
नाशिक

लेखन समिती

घटक क्र. 1

डॉ. कविता साळुंके
नाशिक

डॉ. भूषण कर्डिले
नाशिक

डॉ. एस. के. सूर्यवंशी
सोलापूर

डॉ. एम. एस. उभाळे
उस्मानाबाद

श्री. सचीन पोरे
नाशिक

घटक क्र. 2

डॉ. दत्तात्रेय तापकीर
पुणे

प्राचार्य निर्मला तापकीर
पुणे

डॉ. संजीवनी महाले
नाशिक

प्रा. विजयकुमार पाईकराव
नाशिक

श्रीमती ज्योती लष्करी
नाशिक

घटक क्र. 3

डॉ. एस. के. सूर्यवंशी
सोलापूर

डॉ. पी. बी. दराडे
गारगोटी

डॉ. एस. बी. वाळके
नाशिक

श्री. सचीन पोरे
नाशिक

संपादन समिती (आशय, भाषा व अनुदेशन)

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. कविता साळुंके
प्र.संचालक, व संयोजक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. बी. एस. वाळके
इंग्लिश अॅकेडमी
नाशिक

निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© 2020, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

❑ **प्रथम प्रकाशन** : डिसेंबर २०२० ❑ **प्रकाशन क्रमांक** : २२८९

❑ **अक्षरजुळणी** : अॅकोसिस, नाशिक - 10

❑ **मुद्रक** : **रिलायेबल आर्ट प्रिन्टरी (अहमदाबाद) प्रा. लि.** ३०१, तीसरी मंजिल, पुनित प्लाजा कोम्पलेक्ष, नवगुजरात कोलेज के पीछे, आश्रम रोड, अहमदाबाद-१४

❑ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

B-18-19-108 (EDU 403)

२.२ विषय-विवेचन

२.२.१ वर्ग अध्यापन व वर्ग आंतरक्रियेतील मौखिक भाषेचे महत्त्व

★ वर्ग अध्यापन संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये

वर्ग अध्यापन ही संकल्पना समजून घेण्याआधी आपण अध्यापन ही संकल्पना स्वतंत्रपणे लक्षात घेतली पाहिजे. शिक्षणशास्त्रामध्ये अध्यापन हा शब्द खूप व्यापक अर्थाने वापरला जातो. अध्यापन ही एक व्यापक प्रक्रिया असून तिचा विविध दृष्टिकोनातून अभ्यास केला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनात सुयोग्य बदल घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय या शिक्षक प्रक्रियेतील एक अविभाज्य घटक म्हणजे अध्यापन होय. आधुनिक मानसशास्त्रीय दृष्टिकोनानुसार अध्ययनाचे सुलभीकरण म्हणजे अध्यापन असा महत्त्वाचा अर्थ रूढ झाला. चांगले शिकविणे म्हणजे विद्यार्थ्याला शिकण्यासाठी मदत करणे. हे सूत्र महत्त्वाचे ठरते. अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी पूरक व पोषक वातावरण निर्माण करणे होय. विद्यार्थ्यांनी परिणामकारक रितीने ज्ञान ग्रहण करावे म्हणून सुविधा प्राप्त करून देणारी विशिष्ट परिस्थिती म्हणजे अध्यापन होय.

चांगले अध्यापन ही कला तसेच शास्त्रही आहे. प्रभावी रितीने अध्यापन घडून येण्यासाठी अनेक आवश्यक अशा बाबींचा विचार झाला. त्यातून अध्यापनाची सूत्रे व तत्त्वे जन्माला आली. उदाहरणार्थ, ज्ञाताकडून-अज्ञाताकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे इत्यादी सूत्रे अध्यापन कार्यासाठी मार्गदर्शक ठरू लागली महत्त्वाचे म्हणजे अध्यापन हे फक्त कथन वा व्याख्यान नसून सोबतीला प्रश्नोत्तरे, चर्चा, मौखिक सादरीकरण अशा बाबी महत्त्वाच्या गणल्या जाऊ लागल्या. मौखिक भाषेचा प्रभावी वापर करीत आंतरक्रियात्मक अध्यापन हा एक नवविचार प्रवाह म्हणून लक्षणीय ठरू लागला. चांगले अध्यापन म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील भाषिक स्वरूपाची आंतरक्रियात्मक प्रक्रिया होय.

वर्गात अध्यापन करीत असताना शिक्षक जर केवळ कथनच करीत राहिला तर विद्यार्थ्यांना केवळ ऐकण्याचीच भूमिका करावी लागेल म्हणजेच. त्यामुळे शिक्षक क्रियाशिल राहील व विद्यार्थी केवळ ऐकणारा त्यामुळे वर्गाध्यापनात 'आंतरक्रिया' होणार नाही. कारण आंतरक्रियात्मक अध्यापनात क्रिया व प्रतिक्रिया दोन्हींची आवश्यकता असते.

यावरून आपल्याला भाषिकदृष्ट्या आंतरक्रियात्मक अध्यापनाची खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये सांगता येतील :

★ आंतरक्रियात्मक अध्यापनात विद्यार्थ्यांना प्रतिक्रिया देण्यास भरपूर वाव असतो.

★ आंतरक्रियात्मक अध्यापन दुहेरी स्वरूपाची प्रक्रिया असते.

★ आंतरक्रियात्मक अध्यापनात प्रतिक्रियेबरोबरच प्रत्याभरणही (Feed back) घडत असते.

★ आंतरक्रियात्मक अध्यापनात विद्यार्थी केंद्रित तंत्रे वापरली जातात.

★ अध्यापनात सर्वांच्या सहभागाला महत्त्व दिले जाते.

★ आंतरक्रियात्मक अध्यापनात जिवंतपणा येतो.

मौखिक भाषेचा सुयोग्य वापर करून केलेल्या आंतरक्रियात्मक अध्यापनामुळे, अध्यापन हे केवळ एकसुरी न राहता कृतिप्रधान, सहभागप्रधान उत्साहपूर्वक व आकर्षक स्वरूपात होत राहते. अध्यापन ही चैतन्यमय व जिवंत प्रक्रिया बनते.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये चालू असलेल्या अशा प्रकारच्या आंतरक्रियामुळे शिक्षण हा दुतर्फी व्यवहार बनतो. त्यामध्ये शिक्षकांच्या वतीने माहिती सांगणे, स्पष्टीकरण करणे, वर्णन करणे, प्रश्न विचारणे या क्रिया होत राहतात. तर विद्यार्थ्यांच्या बाजूने प्रश्न विचारणे, शंका उपस्थित करणे. एखाद्या गोष्टीच्या स्पष्टीकरणाची मागणी करणे अशा प्रतिक्रिया घडून येतात व या परस्पर देवाण घेवाणीतून सफल अध्ययन-अध्यापन घडून येते.

लक्षात ठेवा

भाषिक संप्रेषण

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत भाषिक संप्रेषणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुद्रणकलेचा शोध लागण्यापूर्वी गुरुकडून शिष्याला मौखिक रित्या विद्या प्रदान केली जात असे. त्यानंतर ग्रंथसंपदा उपलब्ध झाली व लेखी संप्रेषणाला सुरुवात झाली. अर्थात ज्ञानसंक्रमणाचे माध्यम भाषा हेच होते. भाषिक संप्रेषणात प्रेषकाला म्हणजेच शिक्षकाला संभाषण व लेखन या दोन कौशल्यांवर प्रभुत्त्व संपादन करणे गरजेचे होते. तर ग्राहकाने म्हणजे विद्यार्थ्याने संदेश प्राप्तीसाठी श्रवण व वाचन ही दोन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक ठरते. कारण 'संभाषण व श्रवण' आणि 'लेखन व वाचन' ही परस्परपूरक कौशल्ये आहेत. जसजसा मुलांचा भाषिक विकास होत जातो तसतसे भाषिक संप्रेषणाचे प्रमाण वाढते. प्रौढ शिक्षण वर्गात मात्र ज्यांना नव्यानेच शिकायला सुरुवात करावयाची आहे. त्यांच्यासाठी भाषिक संप्रेषणात संभाषण व श्रवण या दोन कौशल्याचा वाटा मोठा असतो.

(ख) वर्ग आंतरक्रियांमधील विभिन्नता

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया नेहमी एकाच स्वरूपाचा असणे शक्य नाही त्यामध्ये विषयानुसार घटकानुसार व गरजेनुसार वेगवेगळ्या आंतरक्रिया घडून येऊ शकतात.

उदाहरणार्थ,

★ शिक्षक प्रश्न विचारतात.

विद्यार्थी उत्तर देतो.

★ विद्यार्थी प्रश्न अथवा शंका विचारतो.

शिक्षक उत्तर देतात शंका समाधान करतात.

★ शिक्षक अर्धेच विधान करतात.

विद्यार्थी ते विधान पूर्ण करतो.

★ शिक्षक एखादा शब्द अथवा ओळ उच्चारतात.

विद्यार्थी तो शब्द अथवा ओळ म्हणतात.

★ शिक्षक एखादा नियम वा सूत्र सांगतात.

विद्यार्थी त्यावरील उदाहरणे सांगतो.

★ शिक्षक शब्द उच्चारतात.

विद्यार्थी तो शब्द फळ्यावर लिहितो.

अशाप्रकारे वेगवेगळ्या प्रकारच्या क्रिया-प्रतिक्रिया शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये होत असतात या आंतरक्रिया केवळ शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्येच घडतात असे नाही तर त्या विद्यार्थ्यांतदेखील घडू शकतात यावरून सर्व आंतरक्रियांची ढोबळ मानाने खालीलप्रमाणे विभागणी करता येईल.



आकृती क्र.१ : वर्ग आंतरक्रिया प्रकार

त्याचप्रमाणे या आंतरक्रियाचे 'भाषिक व अभाषिक' अथवा 'शाब्दिक व कृतियुक्त' असेही प्रकार पाडत येतात त्यामध्ये अर्थातच भाषिक आंतरक्रियेचे प्रमाण सहसा कृतियुक्त आंतरक्रियेपेक्षा जास्त प्रमाणात दिसून येते



आकृती क्र. २ : अध्यापन प्रकार

वर्ग अध्यापन करीत असताना शिक्षक संपूर्ण वर्गाला उद्देशून कथन करतात. तर मध्येच एखाद्या विद्यार्थ्याला प्रश्न विचारतात गरज वाटली तर तोच प्रश्न दुसऱ्या विद्यार्थ्याला विचारतात तसेच वेगवेगळे प्रश्न वेगवेगळ्या विद्यार्थ्यांना विचारतात काही वेळा उत्तरातील मतभिन्नतेनुसार मुले आपापसात वादाच्या स्वरूपात बोलू लागतात. एकमेकांच्या मताचे खंडन-मंडन चालू होते. परस्पर चर्चा सुरू होते. ही विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया होय. काही वेळ शिक्षक या आंतरक्रियेचे फक्त निरीक्षण करू शकतात.

'अ' ची क्रिया ⟶ 'ब' ची प्रतिक्रिया

'ब' ची क्रिया ⟶ 'अ' ची प्रतिक्रिया

आकृती क्र. ३ : आंतरक्रिया

प्रभावी शिक्षकाच्या वर्गामध्ये सर्व आंतरक्रिया मनमोकळ्या स्वरूपात सुरू असतात. प्रत्येकाला आंतरक्रियेत सहभागी होण्यासाठी मुक्त वाव असतो. शिक्षक व विद्यार्थी दोघेही आंतरक्रिया चालू ठेवण्यात तत्पर असतात. त्यांच्यात जास्तीतजास्त विचारविनिमय व देवाणघेवाण होत राहते. अशा वर्गातील वातावरण उत्साहवर्धक व चैतन्यमय राहते.

वर्गात चालणाऱ्या विविध प्रकारच्या आंतरक्रियांचा बारकाईने अभ्यास करून फ्लॅंडर्स या अभ्यासकाने खालील १० प्रकारच्या आंतरक्रिया सांगितल्या आहेत.

फ्लँडर्स यांनी सांगितलेल्या आंतरक्रिया प्रकार :

★ शिक्षक विद्यार्थ्यांच्या भावनांचा स्वीकार करतात.

★ शिक्षक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात. त्यांची प्रशंसा करतात.

★ शिक्षक विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या कल्पनांचा स्वीकार करतात.

★ शिक्षक विद्यार्थ्यांना अध्यापन घटकावरील प्रश्न विचारतात.

★ शिक्षक स्वतःच्या कल्पना मांडून त्याचे स्पष्टीकरण करतात.

★ शिक्षक विद्यार्थ्यांना काही सूचना अथवा आदेश देतात.

★ शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियेवर, वर्तनावर अथवा मतांवर टिप्पणी करतात तसेच स्वतःच्या मताचे समर्थन करतात.

★ विद्यार्थी स्वतः आपली मते, कल्पना मांडतात शंका विचारतात आणखी माहिती विचारतात.

★ प्रसंगानुरूप वर्गात शांतता अथवा गोंधळ होतो.

अशारितीने वर्गाध्यापन ही एक अत्यंत व्यापक गुंतागुंतीची व बहुआयामी अशी प्रक्रिया असते. त्यामध्ये शिक्षक व विद्यार्थी हे दोन्ही घटक महत्त्वाचे ठरतात आणि त्याचबरोबर दोघांमधील आंतरक्रिया व त्या आंतरक्रियांचे परिणाम हेदेखील महत्त्वाचे ठरतात. शिकणारा कोण आहे? कसा आहे? शिकविणारा कोण आहे? कसा आहे? तसेच कसे शिकविले जाते? शिकविताना नेमके काय घडते? आणि शिकविल्याचा नेमका कोणता परिणाम शिकणाऱ्यांवर होतो? अशा कितीतरी बाबी या संदर्भात पाहणे उद्‌बोधक ठरते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया ही अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा मुख्य गाभा होय.



आकृती क्र. ४ : वर्ग

(ग) वर्ग अध्यापनात भाषिक दृष्टिकोनातून शिक्षकाची भूमिका

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असतो. विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक, पालक, तत्त्वज्ञ, ज्ञानकर्मी, मूल्यमापक, संशोधक, अध्ययन सुलभक अशा विविध भूमिका त्याला पार पाडाव्या लागतात. शिक्षकाच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागाशिवाय अध्ययन-अध्यापन प्रक्रिया होत नाही. शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकाच्या कार्यावर अवलंबून असते.

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील एक कार्यशील व गतिमान घटक असल्यामुळे आपल्या दैनंदिन कामात शालेय विषयाचे अध्यापन शैक्षणिक साधन निर्मिती, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, अभ्यासपूरक साहित्य निर्मिती अशी विविध कामे तो करित असतो. पण या सर्व कामांमध्ये अर्थातच वर्गाध्यापन हे त्याचे सर्वात महत्त्वाचे व मूलभूत असे काम समजले जाते. वर्गाध्यापन कार्यात अर्थातच त्याची भाषिक अभिव्यक्ती ही खूप महत्त्वाची बाब ठरते.

शिक्षकाचे वर्गाध्यापन हे अधिकाधिक प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी भाषेचा समर्पक व प्रभावी उपयोग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अध्यापनातील नीरसपणा टाळून ते प्रेरणादायी व जिज्ञासा जागृती करणारे होण्यासाठी भाषेचा यथोयोग्य वापर करता आला पाहिजे. शिक्षकाचे विविध विषयांमधील आशयज्ञान कितीही समृद्ध असले तरी भाषेच्या योग्य वापराशिवाय ते नीट अभिव्यक्त होत नाही. विषयातील तथाकथित किंवा वरवर अवघड वाटणाऱ्या बाबी सोप्या करून सांगण्यासाठी सुयोग्य व सुलभ भाषेचाच वापर श्रेयस्कर ठरत असतो. सोपे, सुटसुटीत व चपखल शब्दांचा वापर केल्याने अध्यापन हे सुलभ होते. बोलताना कठीण शब्द आला तर त्याचा सोपा व परिचित असा समानार्थी शब्द, विद्यार्थ्यांना सांगितला गेला पाहिजे. त्यासाठी शिक्षकाजवळ पुरेसा समृद्ध असा शब्द संग्रह असला पाहिजे तसेच त्याची एकंदरीत भाषा शैलीही मधुर असावयास हवी.

अध्यापन करताना शिक्षक फक्त पाठ केलेले म्हणून दाखवित नसतो, तर तो विद्यार्थ्यांना काहीतरी समजावून सांगतो. संप्रेषित करित असतो. संवाद साधत असतो. शिक्षक अध्यापनामध्ये जे काही बोलतो ते सर्व विचारपूर्वक बोलतो. त्याचे नियोजनबद्ध बोलणे, विद्यार्थ्यांना योग्य अध्ययनाच्या दिशेने नेते. त्यादृष्टिने शिक्षकाला उत्तम प्रकारच्या भाषिक संप्रेषणाची कला अवगत असली पाहिजे.

अध्यापनातला जास्तीतजास्त वेळ शिक्षक बोलत असला तरी शिक्षकांनी भाषिक संप्रेषणात विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे, त्यांना बोलण्याची संधी द्यावी, त्यांना बोलते करावे, त्यांच्याशी सुसंवाद साधावा हे अपेक्षित असते.

संप्रेषण एकतर्फी नसावे म्हणून अधूनमधून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणे उचित ठरते. यामुळे विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रित करता येते. तसेच त्यांना किती आकलन झाले आहे याचाही अंदाज शिक्षकाना घेता येतो.

वर्गाध्यापनात बोलत असताना शिक्षकाचे उच्चार सुस्पष्ट असावेत. बोलण्याची गती खूप जास्त किंवा संथ नसावी. आवाजात योग्य ठिकाणी चढउतार असावा. एकसुरी आवाजात बोलू नये. महत्त्वाच्या शब्दावर जोर देऊन बोलावे महत्त्वाचा मुद्दा सांगताना मध्ये थोडा विराम द्यावा. मोठा वर्ग असेल तर सर्वांना ऐकू जाते आहे याची खबरदारी घ्यावी पूर्ण वाक्य मोठ्याने बोलावे पुष्कळदा वाक्य अर्धवट सोडून देणे किंवा शेवटचे क्रियापद अगदी हळू आवाजात उच्चारणे अशी सवय आढळते हे टाळावे. बोलताना सर्वांकडे बघावे एका विशिष्ट कोपऱ्याकडे किंवा फक्त पुढच्या विद्यार्थ्यांकडे बघून किंवा वर्गाच्या बाहेर किंवा भिंतीकडे पाहात बोलण्याचे टाळावे.

संकल्पना स्पष्ट करण्यासाठी समर्पक उदाहरणे द्यावीत आवश्यक तेथे दृकश्राव्य साधनांचा उपयोग करावा भाषा शुद्ध आणि कथन प्रवाही / प्रभावी असावे. योग्य वेळी हातवारे व देहबोलीची जोड द्यावी. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. रागाच्या भरात उद्धट किंवा कठोर शब्दांचा वापर करू नये. अपशब्दांचा वापर कटाक्षाने टाळावा.

(घ) वर्गअध्यापनात भाषिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्याची भूमिका

विद्यार्थी अथवा अध्ययनकर्ता हा आपल्या संपूर्ण शिक्षणाचा कणा आहे. म्हणून तर शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक विद्यार्थ्याला शिक्षणातील दैवत मानतात.

'विद्यार्थी काय करतो' असे विचारले तर हा प्रश्न अगदीच सोपा व निरर्थक वाटेल. कारण विद्यार्थी वर्गात बसून शिकतो असे अपेक्षित उत्तर सर्व ज्ञात आहे. शिकतो म्हणजे नेमके काय करतो? तर साहजिकच शिक्षक काय बोलतात ते ऐकत बसतो. काही वेळा तोंडी उत्तर देतो तर काही वेळा लिहून घेतो. परीक्षा असताना मनाने लिहून दाखवितो वर्गात काही चित्र, प्रतिकृती, नकाशा वगैरे दाखविले तर पाहतो. कधी तरी काही करायला सांगितले तर करून दाखवितो असा आहे आपला विद्यार्थी?

परंतु आपल्याला विद्यार्थ्याचे स्वरूप व भूमिका या विषयी इतकी मर्यादित भूमिका घेऊन चालणार नाही इतक्या संकुचित दृष्टिकोनातून विद्यार्थ्याकडे पाहणे म्हणजे त्याच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. विद्यार्थी यापेक्षाही खूप काही असतो. त्याची भूमिका निश्चितच यापेक्षा व्यापक, बहुविध व सखोल असते. वर्गातील निष्क्रिय श्रोता म्हणजे विद्यार्थी हे समीकरण आता आपण मनातून काढून टाकले पाहिजे.

आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते विद्यार्थी हा श्रोता तर असतोच पण त्याचबरोबर तो बोलणारा वक्ता ही असतो. चर्चा करणारा, विचार करणारा, प्रश्न विचारणारा, शंका उपस्थित करणारा, स्वतःचे मत मांडणारा, सादरीकरण करणारा, आक्षेप घेणारा आणि दाद देणाराही असतो. अशा कितीतरी भूमिकांच्या माध्यमातून विद्यार्थी वर्गात वागत असतो. आचरण करीत असतो. अभिव्यक्त होत असतो. मात्र त्याला अभिव्यक्त होण्याची संधी दिली गेली पाहिजे.

विद्यार्थी मुलतःच अनुकरणप्रिय असतात. अनुकरण करणे ही त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती असते. त्यांच्यासाठी अनुकरण हीच अध्ययनाची किंवा शिकण्याची पहिली पायरी असते लहान मुलांचे मातृभाषेचे संपादन हे अनुकरणातूनच घडते. वर्गाध्यापनात शिक्षकाच्या भाषेचे अनुकरणही विद्यार्थ्याकडून होत असते. त्यामुळे शिक्षकाद्वारे शब्दोच्चारण, प्रकट वाचन, कविता गायन इ. चे दिग्दर्शन दाखवून त्याचे अनुकरण करावयास सांगणे इष्ट ठरते. विद्यार्थ्याची भाषा ग्रहण प्रक्रिया शिक्षकांच्या भाषेच्या अनुकरणातून घडते.

विद्यार्थी हा विचार करणारा असतो आणि तो तसा असलाही पाहिजे, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. त्याच्या विचार करण्याच्या क्षमतेवर शिक्षकांनी शंका घेता कामा नये. तर आपण त्याला प्रोत्साहन देऊन त्याची विचार क्षमता वाढीस लावली पाहिजे. भाषा व विचार यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध असतो. विचार प्रक्रियेत भाषेची

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
(महाराष्ट्र शासनाने स्थापितले)
ज्ञानगंगोत्री, मक्तपूर प्रणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२२२२
फोन : (०२ ३) २२३१७१४, २२३१७१ , २२३१७०२७
फॅक्स : (०९१) (०२ ३) २२३१७१६
वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac आणि www.ycmou.ac.in